<u>नियमित दिवाणी दावा क्र. ८०/२०१३</u> <u>निशाणी ५५</u>

**वादी तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा जबाब**
**सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – प्रविण गणेश राठोड

वय – ३० वर्षे

व्यवसाय – वरिष्ठ शाखा प्रबंधक, पंजाब नॅशनल बँक, शाखा अकोला, अकोला

पत्ता – राऊत वाडी, अकोला, ता. जि. अकोला

**<u>वादी तर्फे विधीज्ञ श्री. जे.डी.पाटील यांच्या मार्फत सरतपास</u>**

१. मला न्यायालयाकडुन साक्ष समन्स मिळाल्यामुळे मी न्यायालयात साक्ष देण्यासाठी आलेलो आहे. आमच्या बँकेत वादी ओमप्रकाश रतनलाल शर्मा यांच्या नावाचे बचत खाते आहे. त्यांच्या बचत खात्याचा क्र. ०००९०००१००१०८५६० असा आहे. दि. २९.११.२०११ रोजी वादी ओमप्रकाश शर्मा यांच्या बचत खात्यामधुन रक्कम रु. ७०,०००/– डेबिट झाली आहे. त्या रकमेची शुभम राहुल इंगळे यांच्या नावाने फिक्स डिपॉझिट बनविण्यात आली आहे. सदर फिक्स डिपॉझिट खाते क्र. ०००९००डी.पी.००००२४७४ असा आहे. मला नि.क्र. १२/६ वरील फिक्स डिपॉझिट रिसिप्ट दाखविण्यात आली. त्यावर तत्कालिन बँक अधिकाऱ्याची सही आहे. माझ्याकडे बँकेत उपलब्ध असलेल्या अभिलेखानुसार सदर फिक्स डिपॉझिट रिसिप्ट बरोबर आहे. सदर फिक्स डिपॉझिट २ वर्ष आणि ९ महिने या कालावधीसाठी करण्यात आली होती. सदर फिक्स डिपॉझिट दि. २९.११.२०११ ते २९.०८.२०१४ या कालावधीकरीता होती. सदर फिक्स डिपॉझिट रिसिप्ट मधील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ५६** देण्यात येते.

२. मला वादीने दाखल केलेले नि.क्र. ५४/१ वर मी बचत खाते क्र. ०००९०००१००१०८५६० आणि नि.क्र. ५४/२ वर फिक्स डिपॉझिट क्र. ०००९००डी.पी.००००२४७४ च्या सही शिक्कयाच्या प्रती दाखविण्यात आल्या. नि.क्र. ५४/३ वर बचत खाते क्र. ०००९०००१००१०८५६० चे दि.२९.११.२०११ ते ०३.०३.२०१२ पर्यंतचा बचत खात्याचा सही शिक्कयाचा दाखल केलेला तपशिल दाखविण्यात आला. त्यावर बँकेचा शिक्का व माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व

बरोबर आहे. त्यांना **अनुक्रमे नि.क्र. ५७ ते ५९** देण्यात येते. सदरचे दस्त खरे व बरोबर असल्याबाबत मी भारतीय पुरावा कायदा कलम ६५ बी अन्वये प्रमाणपत्र दिलेले आहे. त्यावर माझी सही व शिक्का आहे. त्यास **नि.क्र. ६०** देण्यात येते. नि.क्र. ५४/४ वर दाखल फिक्स डिपॉझिट क्र.०००९००डी.पी.००००२४७४ चा दि. २९.११.२०११ ते २९.०६.२०२५ पर्यंतचा बँक खात्याचा सही शिक्क्यासह तपशिल दाखविण्यात आला. त्यावर बँकेचा शिक्का व माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ६१** देण्यात येते. सदर फिक्स डिपॉझिट दि. २९.०८.२०२५ रोजी मॅच्युअर्ड होत असलेबाबतचा माझ्या सही शिक्क्यासह दाखल तपशिल दाखविण्यात आला. त्यावर बँकेचा शिक्का व माझी सही आहे. त्यास **नि.क्र. ६२** देण्यात येते आणि फिक्स डिपॉझिटचे सर्व दस्त खरे व बरोबर असलेबाबत मी भारतीय पुरावा कायदा कलम ६५ बी अन्वये प्रमाणपत्र दिलेले आहे. त्यावर माझी सही व शिक्का आहे. त्यास **नि.क्र. ६३** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**प्रतिवादी व प्रतिवादी तर्फे विधीज्ञ बऱ्याच कालावधीपासुन गैरहजर. सबब, प्रतिवादी यांना कोर्ट मोशन नोटीस काढण्यात याव्या.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.08.13 11:24:57 +0530

दिनांक : १२/०८/२०२५.
ठिकाणः बाळापूर

( श्रीमती डी. एम. पाटील )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बाळापूर.